# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN : U45200MH1974SGC 017206

Regd.Office:- Office of the Managing Director, FDCM Bhavan, Ambazari, Hingna Road Nagpur - 440036.

**विभागीय व्यवस्थापक एफ.डी.सी.एम. लिमिटेड आगार विभाग बल्हारशाह यांचे कार्यालय.**

**वनविकास भवन, गौरक्षण वार्ड, बल्हारपुर तह. बल्हारपुर जि. चंद्रपूर**

Telephone No. 07172-240406 Email. Id : dmballarshah@rediffmail.com Website : www.fdcm.nic.in


## निरूपयोगी भंगार इमारती पाडुन निघालेल्या लाखडी साहित्याची खुल्या पध्दतीने विक्री करावयाच्या

## अटी व शर्ती

1. लॉटनिहाय विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याचे वर्णन निम्नहस्ताक्षरकर्ता अधिकारी यांचे माहीती नूसार बरोबर आहे. विक्रीकरिता ठेवण्यात आलेली निरुपयोगी भंगार साहित्य ''आहे त्या स्थितीत'' विकावयाची आहेत. इच्छूक निविदाधारकांनी लॉट निहाय लावलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याची प्रत्यक्ष तपासणी करून निरुपयोगी भंगार साहित्याचे वर्णन इत्यादी बरोबर/खरे असल्याबाबत स्वतः खात्री करावी. निरुपयोगी भंगार साहित्याची पाहणी/तपासणी खुल्या लिलावापूर्वी कार्यालयीन वेळेत करता येईल. विक्रीस ठेवलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याच चुकीचे वर्णन देण्यात आले या सबबीवर विक्री रद्द करता येणार नाही, व कसलीही नुकसान भरपाई देता येणार नाही.

2. खुल्या लिलावात सहभाग घेण्यासाठी लिलावाचे दिवसी किमान रु. 1000/- रक्कम EMD स्वरुपात भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच बोली स्वीकारल्या जाईल.

3 खरेदिदाराने EMD फार्मवर स्वतःचा पोष्टाचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता लिहणे आवश्यक आहे. पत्यात काही बदल झाल्यास त्याबाबतची माहीती त्वरीत या कार्यालयास देणे बंधनकारक राहिल.

4. खरेदीदाराने खरेदी केलेल्या किंमतीच्या 17 % रक्कम अनामत रक्कम म्हणुन ( E.M.D.) बॅंक ड्राफ्ट/RTGS/Pay Order चे स्वरूपात जोडणे आवश्यक आहे.

5. निविदाधारकाने निविदेत भरलेले दर निविदा मंजुर झाल्यापासून 180 दिवसापर्यंत ग्राह्य राहीतील.

5. खरेदीदाराने EMD फार्म सोबत पॅन नंबर व आधार कार्डची झेरॉक्स प्रत जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा लिलाव मंजूर केला जाणार नाही.

6. कोणतेही कारण न दर्शविता विक्रीसाठी ठेवलेली निरुपयोगी भंगार साहित्य कोणत्याही क्षणी विक्रीतून काढुन टाकण्याचा किंवा रद्द करण्याबाबतचा अधिकार विभागीय व्यवस्थापक, आगार विभाग, बल्हारशाह यांनी राखुन ठेवलेला आहे.

7. खरेदिदाराने माल खरेदी कल्यानंतर त्यास सर्व अटी व शर्ती मान्य आहेत असे समजण्यात येईल.

8. यशस्वी खरेदीदाराने अनामत रकमेच्या समायोजनेनंतर उर्वरीत विक्री रक्कम, जी.एस.टी., आयकर अधिनियमान्वये आयकर, मुंबई विकी कर कायदा 1959 चे तरतुदीनुसार आयकर (1%) व जी.एस.टी ॲक्ट 2017 प्रमाणे (18%) तसेच इतर सर्व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा खरेदीदाराची बोली मंजूर झाल्याचे तारखेपासून 30 दिवसांचे आंत करणे बंधनकारक आहे. सर्व देय रक्कमेचा भरणा बॅंक ड्राफट/RTGS/Pay Order चे स्वरुपात विभागीय व्यवस्थापक आगार विभाग बल्लारशाह यांचे नावांने बल्लारशाह जि. चंद्रपूर येथील कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकच्या शाखेवर काढलेला असावा.

9. जर यशस्वी खरेदीधारक विहीत मुदतीत मंजुर रकमेचा म्हणजे विक्री रक्कम, जी.एस.टी. व इतर अनुज्ञेय कर/आकार इ. पुर्ण देय रक्कमेचा भरणा करण्यात असमर्थ ठरला तर विभागीय व्यवस्थापक, आगार विभाग, बल्लारशाह यांना एफ.डो.सी.एम. लिमीटेडने प्रदान केलेल्या अधिकार व शास्ती नुसार अशा खरेदीधारकाची स्विकारलेली बोली रद्द करण्यात येईल. व अशा खरेदीधारकाने सोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व नमुद केलेली मालमत्ता पुन्हा विकीसाठी ठेवण्यात येईल. पुर्नविकीमध्ये वनविकास महामंडळास जर काही नुकसान झाले तर त्याची जबाबदारी पहिल्या यशस्वी निविदाधारकांवर राहील व नुकसानीची रक्कम थकीत राजस्व म्हणुन त्यांचेकडुन वसुल करण्यात येईल. अशी थकीत रक्कम भरणा करणेबाबत नोटीस प्रेषित केल्यापासुन 15 दिवसांचे आत या कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील. जर विहीत मुदतीचे आंत थकीत रकमेचा भरणा न केल्यास प्रचलित दरानुसार व्याज रक्कम आकारण्यात येवुन अशा सर्व रकमेचा भरणा करणे पहिल्या खरेदीधारकावर कायदेशीररित्या बंधनकारक राहील. मात्र पुर्नविकीत काही नफा झाल्यास त्यावर पहिल्या खरेदीधारक कोणताही हक्क/दावा राहणार नाही.

10. यशस्वी खरेदीधारकास विक्री मंजूर झालेल्या तारखे पासुन 30 दिवसांचे आंत सर्व विकी किंमत व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा करून नमुद केलेल्या निरुपयोगी भंगार साहित्याचा ताबा घ्यावा लागेल.

11. निरुपयोगी भंगार साहित्याची उचल (डिलीव्हरी) खरेदीधारक नमुद केलेल्या पर्ण लॉटप्रमाणे देण्यात येईल. ( एक लॉटचे भागाचे प्रमाणात उचल (डिलीव्हरी) देण्यात येणार नाही.) मात्र यशस्वी खरेदीधारकाने त्या लॉटच्या संपुर्ण विक्री किंमतीचा व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा केलेला असावा.

12. खरेदी किंमत पूर्ण भरून यशस्वी खरेदीधाकर विक्री मंजूरीच्या तारखेपासून 30 दिवासांचे आंत खरेदी केलेला माल उचलण्यात असमर्थ ठरला तर विभागीय व्यवस्थापक आगार विभाग 15 दिवसापर्यंत मुदतवाढ देवु शकतील. मात्र त्यापूर्वी या साठी खरेदीधारकांस खरेदी किंमतीच्या 2.5 % जागेचे भाडे ( Ground Rent ) भरावे लागेल. त्यापुढील 30 दिवसाची मुदतवाढ महाव्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. लिमी., दक्षिण चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर देवु शकतील. त्यासाठी विक्री किंमतीच्या 5 % पेक्षा अधिक जागेचे भाडे असणार नाही. एवढी रक्कम जागेचे भाडे भुर्दंड म्हणुन खरेदीदारास आगाऊ भरावी लागेल. खरेदी किंमत तसेच जागेचे भाडे इत्यादीसह देय रक्कमेचा पूर्ण भरणा केल्यानंतरच खरेदीदारास खरेदी केलेल्या वस्तुचा ताबा देण्यात येईल.

13. विक्री केलेल्या मालाची उचल वाहतूक व्यवस्था खरेदीदारास स्वतःचे खर्चाने करावे लागेल.

14. विक्री केलेल्या मालाची उचल (डिलीव्हरी) कार्यालयीन वेळेतच व कार्यालयीन दिवशीच करण्यात येईल. सुट्टीचे दिवशी उचल करू देता येणार नाही.

15. खरेदीदाराने नमुद केलीली रक्कम स्विकृत केल्यानंतर त्या लॉटची/निरुपयोगी निरुपयोगी भंगार साहित्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित खरेदीदाराची राहील. आग/चोरी/नैसर्गीक आपत्ती इत्यादी कोणत्याही कारणाने विक्री झालेल्या साहित्यास क्षती पोहचल्यास किंवा नष्ट झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. व त्याची कोणतीही नुकसान भरपाई महामंडळाकडून देण्यात येणार नाही.

16. या निविदेतील अटी व शर्ती संबंधी उभय पक्षात काही वाद उद्‌भवल्यास मा. प्रादेशिक व्यवस्थापक , एफ.डी.सी.एम. लिमी.,दक्षिण चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर यांचा निर्णय अंतीम राहील व तो निर्णय उभयतांना बंधनकारक राहील.

विभागीय व्यवस्थापक,
आगार विभाग, बल्हारशाह

## अटीचे मान्यतापत्र

वरील सर्व अ.क. 1 ते 16 अटी मी वाचल्या असून त्या मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करीत आहे.

खरेदीधारकाची स्वाक्षरी.